# - प्रेस नोट -

दि. १४/०६/२०२६

## आर.सी.एफ  पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. १२/०६/२०२६ रोजी १४.५५ वा. च्या सुमारास फिर्यादी अविनाश पुंजाराम वाघचौरे वय-३४ वर्षे, धंदा - रिक्षाचालक, रा.ठी. चेंबुर, मुंबई हे सनातन स्कुलच्या समोरील आर.सी.मार्गावर असणाऱ्या रिक्षा स्टॅंड येथे रिक्षा उभी करून प्रवांशाची वाट बघत असताना अटक आरोपी क्रमांक ०१ पुरुष वय-२२ वर्षे व अटक आरोपी क्रमांक ०२ पुरुष वय-१९ वर्षे यांनी त्यांची रिक्षा फिर्यादीच्या रिक्षेच्या पुढे लाउन पॅसेंजर भरू लागले सदर गोष्टीस फिर्यादी यांनी विरोध केला या कारणांवरून अटक आरोपींनी फिर्यादीस धमकावले व त्यांचा जीव घेण्याच्या उद्देशाने अटक आरोपी क्रमांक ०२ याने त्याच्या हातातील कंबरेचा बेल्ट फिर्यादी यांच्या गळयाला गुंडाळुन आवळला व त्यावेळी अटक आरोपी क्रमांक ०१ याने त्याच्या हातातील कडे फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले  व अटक आरोपी क्रमांक ०१ याने फिर्यादीच्या पॅटंच्या उजव्या खिशातील २,०५०/ रुपये  जबरदस्तीने काढुन घेतले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १३/०६/२०२६ रोजी गु.र.क्र.३९०/२६,कलम १०९,३११,३५२,३५१(२),३(५) बीएनएस २०२३ सह कलम १३५,३७(१) मपोका  अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------